२५ वर्षे विश्वासाची

follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd No.72105/99 ✲ वर्ष २५ ✲ अंक २७४ ✲ सातारा ✲ ✲ सातारा ✲ शुक्रवार ✲ दि. १४ जून २०२४ ✲ पाने ८ ✲ किंमत ५ रू/

# विधानसभा आणि महापालिका निवडणुकीत आपला भगवा : देवेंद्र फडणवीस



**मुंबई :** भारतीय जनता पक्षाचं आणि मुंबईच्या कार्यकर्त्यांचं मी विशेष अभिनंदन करतो. नुकत्याच लोकसभा निवडणुका झाल्या, त्या निवडणुकीत महायुतीला तुमच्यामुळे मुंबईत महाविकास आघाडीपेक्षा दोन लाख मतं जास्त मिळाली. महाराष्ट्रात दोन लाख मतं कमी मिळाली पण मुंबईकरांनी महायुतीला २६ लाख मतं दिली आणि महाविकास आघाडीला २४ लाख मतं दिली. दोन लाख मतं जास्त मिळाली. निवडणुकांमध्ये अर्थमॅटिक वेगळं होतं त्यामुळे आपल्या दोन आणि त्यांच्या चार जागा आल्या असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुंबईत आज भाजपा विजय संकल्प मेळावा पार पडला त्यात देवेंद्र फडणवीस यांनी हे वक्तव्य केलंय.

### महाराष्ट्रात पॉलिटिकल अर्थमॅटिक आपल्या विरोधात गेलं

महाराष्ट्रातही पॉलिटिकल अर्थमॅटिक आपल्या विरोधात गेलं हे खरं आहे. पण मतांमध्ये कुठेही कमतरता पडली नाही. आपल्या ४३.६ टक्के त्यांना ४३.९ टक्के आहे. .३० इतकाच फरक आहे. त्यामुळे त्यांना विजय मिळाल्याचा आभास तयार करता आला. भाजपाच्या १३ जागा अशा आहेत ज्या चार टक्केंपेक्षा कमी मतांनी आपण हरलो आहोत. जे जिंकले त्यांना शुभेच्छा आहे. आता आपल्याला जे मिळालंय ते पुढे घेऊन जाऊ. ज्या पक्षाला एकेकाळी दोन खासदारांवरुन हिणवलं होतं त्या पक्षाच्या नेत्यांनी रेकॉर्ड केला आणि पंडीत नेहरुंच्या नंतर तिसऱ्यांदा पंतप्रधान होणारे नरेंद्र मोदी आहेत. कधी कधी मेरिटमध्ये पास होणारा मुलगा डिस्टिंक्शनमध्ये ७५ टक्के मिळाले तरीही लोकांना वाटतं मेरिटचा मुलगा होता. तर जो ३५ टक्के मार्क मिळवतो त्याला ४० टक्के मिळाले तर लोक त्याची हत्तीवरुन वरात काढत आहेत. संपूर्ण इंडिया आघाडी मिळून जेवढ्या जागा मिळाल्या त्याहून जास्त जागा भाजपाला मिळाल्या. आपली लढाई फेक नरेटिव्हशी होती. ज्या ठिकाणी आपण कमी पडलो त्या ठिकाणी त्या ठिकाणी इंडिया आघाडीशी हरलो नाही, फेक नरेटिव्हमुळे कमी पडलो आहे. देशातल्या ७६ जागा अशा आहेत जिथे कमी फरकाने आपण पडलो. संविधान बदलणार या खोट्या प्रचारामुळे या गोष्टी घडल्या. असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

### विधानसभेवर आणि मुंबई महापालिकेवर आपला भगवा फडकणार

फेक नरेटिव्ह फॅक्टरीला सोशल मीडियावर आपण तेवढ्या ताकदीने उत्तर देऊ शकलो नाही किंवा डॅमेज इतकं होतं आहे हे लक्षात आलं नाही. त्यामुळे कमी फरकाने आपण देशात ७६ सीट हरलो. काही लोक डमरु वाजवत आहेत, काही लोक छाती बडवत आहेत, त्या सगळ्यांना मी सांगतो फेक नरेटिव्ह एकदा चालतो तो वारंवार चालत नाही. आम्ही पुन्हा येऊ. असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्रात आपण डाऊन झालो आहोत पण आऊट नाही हे लक्षात घ्या. पूर्ण ताकदीने विधानसभा जिंकणार आहोत. विधानसभेत आपण जास्त जागा जिंकू आणि महापालिका निवडणूक कधीही येऊद्या कधीही महानगरपालिकेवर आपला भगवा फडकणारच. असा निर्धारही देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केला.

फेक नरेटिव्ह असताना आम्ही आमचा गड राखू शकतो हे मुंबई भाजपाने दाखवून दिलं आहे. भाजपाचं काम खालपर्यंत रुळलं आहे हा माझा विश्वास आहे. हे सगळं घडताना एक नक्की सांगेन. निवडणुकीत स्पर्धा असणं, आपण जिंकणार आहोत तर कमी काम केलं तरी चालतं, काही चमकेश नेते तयार होणं या गोष्टी जिंकलो तरीही आणि हरलो तरीही टाळणं आवश्यक आहे. नेते आणि कार्यकर्ते यांची पारख कधी होते? जेव्हा आपण जागा हरतो. २०१९ मध्ये जेव्हा विजय मिळवून सरकार गेलं तेव्हाही अनेकांची पारख झाली. आत्ताही तशीच पारख झाली. असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले. देशातल्या चार राज्यांमध्ये अपेक्षानुरुप निकाल आला असता तर छात्या बडवणारे वेगळ्या प्रकारे छात्या बडवताना दिसले असते. इतिहासातून शिकायचं असतं आणि पुढे जायचं असतं. आपण तसेच पुढे जात आहोत. असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

### काय म्हणाले देवेंद्र फडणवीस?

**मुंबईत लोकसभेच्या महाविकास आघाडीच्या चार जागा कुठून आल्या हे नीट पाहिलं तर लक्षात येईल की सामान्य मुंबईकर आणि मराठी माणसांनी त्यांना मतदान केलेलं नाही. मुंबईत असलेल्या, चार पिढ्या मुंबईकर असलेल्या उत्तर भारतीयांनी मतदान केलेलं नाही. त्यांना नेमकं कुठून मतदान मिळालं तर लक्षात येईल की मागचे चार महिने ज्यांचे पाय ते पकडत होते, ज्यांच्यासाठी त्यांनी हिंदू बांधवांनो भगिनींनो म्हणलं सोडलं होतं. तसंच ज्यांच्यासाठी त्यांनी हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे म्हणणं सोडून जनाब बाळासाहेब ठाकरे केलं होतं. केवळ त्यांच्याच मतांवर त्यांनी अर्थमॅटिक जिंकलं आहे. मात्र हे सगळं विधानसभेत आणि महापालिकेत चालणार नाही. मी हे सांगू इच्छितो की मुंबईकरांचा विश्वास हा नरेंद्र मोदींवर आहे. भरभरुन मतं आपल्याला मिळाली आहेत. वरळीसारख्या मतदारसंघात फक्त सहा हजारांचा लीड मिळाला. तिथे आदित्य ठाकरे आमदार आहेत आणि त्यांना आमदार करण्यासाठी दोन आणखी आमदारांनी ज्या वरळीत तयार केले तिथे अवघा ६ हजार मतांचा लीड मिळाला. टेम्प्रेचर कुठे आहे ते लक्षात येतं आहे.**

# मलाही मोकळ करा; शिंदे सरकारमधील मंत्र्याकडून फडणवीसांचा कित्ता

**सातारा :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र भाजपच्या सुमार कामगिरीची जबाबदारी स्वीकारत उपमुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देऊ केला आहे. फडणवीसांच्या राजीनाम्याबाबत अद्याप भाजप श्रेष्ठींचा कुठलाही निर्णय झाला नाही, परंतु भाजप कार्यकर्त्यांपासून नेते-मंत्र्यांपर्यंत अनेकांनी फडणवीसांना पदावर कायम राहण्याची विनंती केली आहे. अशातच शिंदे सरकारमधील आणखी एका मंत्र्याकडून फडणवीसांचा कित्ता गिरवण्यात आला आहे. फडणवीसांप्रमाणेच मलाही मोकळ करा अशी विनवणी शंभुराज देसाई यांनी केली आहे.

लोकसभा निवडणुकीत सातारा लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार उदयनराजे भोसले यांना पाटण विधानसभा मतदारसंघातून मताधिक्य मिळाले नाही. उदयनराजे विजयी झाले असले, तरी घटलेल्या मताधिक्यामुळे शंभुराज देसाई यांचा पराभव झाला आहे. मंत्रिपदामुळे शिवसेनेच्या कार्यकर्त्यांच्या डोक्यात सत्ता जाऊन त्यांना सूज व सुस्ती आल्यामुळे घटलेले मताधिक्य ही माझी जबाबदारी आहे असे साताऱ्याचे पालकमंत्री शंभुराज देसाई म्हणाले.

शंभुराज देसाई हे शिवसेनेच्या तिकिटावर साताऱ्यातील पाटण विधानसभा मतदारसंघातून निवडून आले आहेत. एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंची साथ सोडल्यानंतर देसाईही त्यांच्या साथीला गेले. ठाकरे सरकारमध्ये त्यांनी गृह राज्यमंत्रिपदासह अर्थ आणि नियोजन, महसूल विभागाचे राज्यमंत्रिपद सांभाळले होते. सध्या त्यांच्याकडे सातारा आणि ठाण्याच्या पालक मंत्रिपदाची जबाबदारी आहे. याशिवाय ते शिंदे सरकारमध्येही महसूल खात्याचे राज्यमंत्रिपद सांभाळत आहेत.

याआधी, लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपने नोंदवलेल्या निराशाजनक कामगिरीची जबाबदारी घेऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पदाचा राजीनामा देण्याच्या विचारात आहेत. त्यांनी गेल्या शुक्रवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांची दिल्लीत भेट घेतली. फडणवीस यांनी राजीनामा देण्याची गरज नसल्याचे शहा यांनी स्पष्ट केले तरी फडणवीस आपल्या निर्णयावर ठाम आहेत.

# महायुतीकडून आदित्य ठाकरे विरोधात उमेदवार निश्चित

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीनंतर राज्यातील पक्षांनी विधानसभा निवडणुकीकडे लक्ष केंद्रीत केले आहे. एकीकडे लोकसभेतील पराभवाचे विश्लेषण सुरु असताना विधानसभेचा आखाडा ठरवला जात आहे. बड्या नेत्याविरोधात चर्चेतील उमेदवार उतरवण्याची चाचपणी सुरु आहे. त्याचवेळी शिवसेना उबाठामधील दिग्गज नेते आदित्य ठाकरे यांना पराभूत करण्यासाठी महायुतीने तयारी सुरु केली आहे. आदित्य ठाकरे विरोधात वरळी विधानसभेतील उमेदवार ठरला आहे. वरळी मतदारसंघात आदित्य ठाकरे यांना मनसेचे नेते संदीप देशपांडे आव्हान देणार आहे. त्यासंदर्भात मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी ग्रीन सिग्नल दिले आहे.

लोकसभा निवडणुकीत राज्यात मिळालेल्या विजयानंतर महाविकास आघाडीचा आत्मविश्वास वाढला आहे. महायुतीकडून पराभवाचे चिंतन होत असताना विधानसभेची रणनीती तयार केली जात आहे. लोकसभेनंतर आता राजकीय पक्षांना विधानसभा निवडणुकीचे वेध लागले आहे.

महायुतीमधील राज ठाकरे यांचा मनसे पक्ष विधानसभा निवडणुकीत पूर्ण ताकदीनिशी उतरणार आहे.

मुंबईतील वरळी मतदारसंघात आदित्य ठाकरे यांना मनसेचे संदीप देशपांडे आव्हान देणार आहे. राज ठाकरे यांच्याकडून संदीप देशपांडे यांना वरळी विधानसभा लढवण्यासाठी ग्रीन सिग्नल मिळाला आहे. मनसे नेते संदीप देशपांडे यांना ग्रीन सिग्नल मिळताच त्यांची तयारी सुरु आहे. मनसेकडून वरळी विधानसभेत ठीक ठिकाणी बॅनर लावून करण्यात शक्ती प्रदर्शन करण्यात आले आहे. आदित्य ठाकरे यांना पराभूत करण्यासाठी मनसे निवडणुकीच्या सहा महिन्यांपूर्वीच तयारीला लागली आहे. लोकसभेत एकत्र असलेली महायुती विधानसभेत एकत्र असण्याची शक्यता आहे.

मनसे महायुतीत २० जागांची मागणी करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. संदीप देशपांडे राज ठाकरे यांचे विश्वासू सरदार म्हणून ओळखले जातात.

मनसेची भूमिका सातत्याने ते सोशल मीडिया आणि माध्यमातून मांडत असतात. वेगवेगळी आंदोलने करुन ते चर्चेत असतात.

# सातारा जिल्ह्यात उन्हाळी पीक क्षेत्रात घट

## दीड हजार हेक्टरवरच झाली पेरणी



**सातारा :** जिल्ह्यात दुष्काळ असल्याने यावर्षी उन्हाळी पिकाची हवाच गेली आहे. त्यामुळे सुमारे दीड हजार हेक्टरवरच पेरणी झाली. ३२.३० टक्के हे प्रमाण आहे. तर आता खरीप हंगामावरच शेतकऱ्यांची भीस्त असून सर्वांचेच मान्सूनच्या आगमनाकडे डोळे लागले आहेत.

जिल्ह्यातील खरीप आणि रब्बी हे दोन हंगाम महत्वाचे समजले जातात. यातील खरीप हा सर्वात मोठा हंगाम असतो. सुमारे तीन लाख हेक्टर क्षेत्र राहते. तर रब्बीत दोन लाख हेक्टरवर पेरणी होते. जून महिन्यात मान्सूनचा पाऊस सुरू झाल्यानंतर खरीप हंगाम पेरणीची गडबड सुरू राहते.

या मान्सूनवर शेतकऱ्यांचे वर्षभराचे पिकांचे गणित अवलंबून असते. पर्जन्यमान चांगले झाले तर खरीप आणि रब्बी हंगामही पदरी पडतो. तसेच उन्हाळी हंगामातहीशेतकरीपिके घेतो. पण, गेल्यावर्षी जिल्ह्यातच अपुरे पर्जन्यमान झाले. खरीप आणि रब्बी हंगामात शेतकऱ्यांना फटका बसला.

उत्पादन कमी झाले. त्यातच दुष्काळी परिस्थितीही निर्माण झाली. यामुळे जिल्ह्यातील उन्हाळी हंगामावर परिणाम झाला.

कृषी विभागाकडून सातारा जिल्ह्यात उन्हाळी हंगामाचे सर्वसाधारण क्षेत्र ४ हजार ८६० हेक्टर निश्चीत करण्यात आले होते. यामध्ये उन्हाळी भुईमूग, मका, सूर्यफूल, सोयाबीन ही पिकेशेतकरीघेतील असा अंदाज होता. मात्र, भुईमूग, मका, सोयाबीन पिके घेण्यात आली. सूर्यफुलाची कोठेही पेरणी झालेली नाही. त्यामुळे दुष्काळाच्या धसक्याने शेतकऱ्यांनी उन्हाळी पिकांकडे कानाडोळा केल्याचे दिसून आले आहे.

### उन्हाळी सोयाबीन १६०० वरुन १४ हेक्टरवर

**मागील तीन वर्षांपूर्वी सोयाबीनला चांगला दर मिळाला. त्यामुळे खरीप हंगामात सोयाबीनचे क्षेत्र वाढले. तसेच दोन वर्षांपूर्वी उन्हाळी सोयाबीन १ हजार ६०० हेक्टरवर घेण्यात आले होते. पण, गेल्या वर्षभरापासून सोयाबीनला दर कमी मिळत आहे. त्यातच दुष्काळी स्थिती असल्याने यंदा उन्हाळी सोयाबीन क्षेत्रात मोठी घट झाली आहे. सोयाबीनचे अंदाजे क्षेत्र ३१ हेक्टर निश्चीत करण्यात आलेले. प्रत्यक्षात १४ हेक्टरवर पेरणी झाल्याचे समोर आलेले आहे.**

### भुईमूग ११२४ तर मका ४१३ हेक्टरवर

**जिल्ह्यात उन्हाळ्यात २ हजार ६९९ हेक्टरवर भुईमूग घेण्यात येईल असा अंदाज होता. पण, प्रत्यक्षात १ हजार १२४ हेक्टरवर पेर झाली. ४१.६७ टक्के पेरणी प्रमाण आहे. तर मकाचे सर्वसाधारण क्षेत्र २ हजार ७४ हेक्टर होते. तर पेरणी ४१३ हेक्टरवर झाली. सुमारे २० टक्के क्षेत्रावरच मका पिकाची पेरणी झालेली आहे. सातारा तालुक्यात ३७२ हेक्टर उन्हाळी पिकाचे क्षेत्र होते. पण, पेरणी १४१ हेक्टरवरच झालेली आहे. तसेच जावळीत ३२ हेक्टर, पाटण २०६ हेक्टर, कऱ्हाड तालुक्यात ९३, कोरेगाव ६४, खटाव ४५३, माण ४८ हेक्टर, खंडाळा ९३, फलटण १०३ आणि वाई तालुक्यात ३४ हेक्टरवर उन्हाळी पिके घेण्यात आलेली आहेत.**

# अमोल किर्तिकर विजयी होणार : संजय राऊत

**मुंबई :** अमोल किर्तिकर यांच्यासंदर्भातील निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दबाबात घेतला आहे. त्या ठिकाणी रवींद्र वायकर यांचे लोक मोबाईल घेऊन फिरत होते. परंतु आता चार महिन्यांत सरकार बदलणार आहे. केंद्रातील सरकारही लवकरच बदलणार आहे. मग वंदना सूर्यवंशी कुठे जाणार आहे. या ठिकाणी अमोल किर्तिकर विजयी होणार आहे. आम्ही न्यायालयात जाणार आहे. त्या ठिकाणी आम्हाला न्याय मिळणार आहे, असे संजय राऊत यांनी म्हटले आहे. ते प्रसिद्धी माध्यमांशी बोलत होते.

ते पुढे म्हणाले,मुंबईच्या उत्तर पश्चिम लोकसभा मतदार संघात निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून वंदना सूर्यवंशी यांनी काम पाहिले. त्या सर्वात भ्रष्टाचारी अधिकारी आहेत. त्यांनी मतमोजणी दरम्यान अनेक कारनामे केले आहेत. त्यांनी सीसीटीव्ही फुटेज बंद केले. आता ते सीसीटीव्ही फुटेज मिळत नाही. अहंकाराचे सर्व मर्यादा मोदी आणि शहा यांनी सोडली आहे. त्यामुळे आता भाजपामध्ये जे आरएसएसची लोक बसलेली आहेत ते मोदींविरोधात बंड पुकारणार आहे. देशात दोन तानाशहा (नरेंद्र मोदी, अमित शाह) राज्य करत आहेत. आरएसएसने हे देखील सांगितले होते की भाजप आणि शिवसेनेची युती तुटू देऊ नका. परंतु त्यांचे ऐकले गेले नाही. आरएसएसने एक नैतिक ताकद भाजपाला दिली आहे. परंतु भाजपाने आता आरएसएसला संपवण्याचा ठरवले आहे.

# पुणे नाशिक औद्योगिक दूतगती महामार्गाचे काम थांबवा; अजितदादांचे आदेश

**पुणे :** विविध प्रकल्पांना जमिनी दिल्यानंतर आता पुणे-नाशिक औद्योगिक दृतगती महामार्ग आणि पुणे -नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेसाठी खेड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमीन मोठ्या प्रमाणात संपादित होणार आहे. त्यामुळेच सेमी हायस्पीड रेल्वेला जोडून दृतगती महामार्गाची आखणी करता येईल का याची चाचपणी करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रस्ते विकास महामंडळाला दिल्या. त्याचवेळी सध्या पुणे-नाशिक दृतगती महामार्गाचे सद्या सुरू असलेले काम तूर्त थांबवा, अशाही स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या आहेत.

## मोहिते पाटील-वळसे पाटलांचा विरोध

पुणे-नाशिक हा सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प सद्या प्रलंबित आहे. दुसरीकडे, पुणे-नाशिक औद्योगिक दृतगती महामार्ग करण्यात येणार आहे. रस्ते विकास महामंडळाकडून मार्गाची आखणीही करण्यात आली. औद्योगिक महामार्गाला स्थानिक लोकप्रतिनिधींसह शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला आहे. या संदर्भात मुंबईत बैठक झाली. बैठकीत सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील, खेडचे आ.दिलीप मोहिते-पाटील, आ. अतुल बेनके, अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, जिल्हाधिकारी सुहास दिवसे आदी उपस्थित होते. पुणे - नाशिक रेल्वे, औद्योगिक दृतगती महामार्गामुळे खेड तालुक्यातील मोठ्या प्रमाणात जमिनी बाधित होत आहेत. यापूर्वीच्या विविध प्रकल्पांसाठी शेतकऱ्यांनी जमिनी दिल्या आहेत. पुणे - नाशिक औद्योगिक महामार्गाच्या आखणीमुळे मोठ्या प्रमाणात पुन्हा जमिनी जाणार आहेत. हा महामार्ग चाकणपासून काही किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे त्याचा थेट औद्योगिक कंपन्यांना फायदा होत नाही. तळेगाव- शिक्रापूर मार्गावरील राशे गावात रेल्वे आणि औद्योगिक महामार्ग क्रॉस होत असून त्यामुळे गावाचे मोठे नुकसान होत आहे,

याकडे आ. दिलीप मोहिते -पाटील यांनी बैठकीत लक्ष वेधले. 'झिगझॅग' पद्धतीने महामार्गाची आखणी केली असून त्याचा औद्योगिक कंपन्यांना उपयोग नाही. त्यामुळे या मार्गाला सर्व लोकप्रतिनिधींनी विरोध केला आहे, असे अजित पवार यांच्या निदर्शनास आणून दिले.

पुणे - नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेमार्गासाठी आखणी करण्यात आली. त्याला जोडूनच औद्योगिक महामार्गाची आखणी करता येईल का, त्याबाबत चाचपणी करा. तसेच औद्योगिक महामार्गासंदर्भात सध्या सुरू असलेले काम थांबवा, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या आहेत. त्यामुळे आम्ही पुणे- नाशिक औद्योगिक दृतगती महामार्ग रेल्वे मार्गाला जोडून घेता येईल का याची चाचपणी करू', असे राज्य रस्ते विकास महामंडळाच्या सूत्रांनी सांगितले. खेड तालुक्यातील पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे, औद्योगिक महामार्ग, पुनर्वसन, कालवे, औद्योगिक महामंडळासाठी जमिनी दिल्या आहेत. आता लोकप्रतिनिधींसह शेतकऱ्यांची जमिनी देण्याची पुन्हा मानसिकता नाही. पुणे- नाशिक औद्योगिक दृतगती महामार्गाचा आम्हाला कोणताच फायदा नाही. त्यामुळे आमचा या महामार्गाला विरोध कायम आहे.

## संपादकीय

# ‘नीट’ नेटके नाही!

परीक्षेचा निकाल चांगला लागला, एखाद्या विद्यार्थ्याला चांगले गुण मिळाले, की आनंद होणे साहजिक. त्यातून ते ९० टक्के किंवा त्याहून अधिक वगैरे असतील, तर विद्यार्थी-पालकांना आकाश ठेंगणे होते. ‘हुशार’ १० टक्क्यांमधील असणे याला सामाजिक प्रतिष्ठेचे एक लोभस वलय आहे. पूर्वी हे अधिक होते; कारण ‘हुशार’ १० टक्क्यांमध्ये परीक्षा दिलेल्यांपैकी जेमतेम एक टक्का असायचे. पण, अलीकडे दहावी-बारावीच्या निकालानंतर असे ‘गुण’वंत गल्लोगल्ली सापडतात. म्हणजे ९० टक्के मिळवणे हे चांगलेच, पण ते मिळवण्याचेही अलीकडे सुलभीकरण झाले आहे की काय, त्याचेही एक ठरावीक सूत्र सापडले आहे की काय, असे वाटावे अशी आजची शिक्षण स्थिती आहे. राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावीचा निकाल ‘सर्वोत्तम पाच’ म्हणजे सहापैकी ज्या पाच विषयांत सर्वोत्तम गुण आहेत, त्यावरून काढलेली टक्केवारी अशा पद्धतीने जाहीर करायला सुरुवात केली तेव्हापासून हे असे ‘गुण’वंत वाढले असल्याची चर्चा होत आहेच. ही निकालात वाढ होत नसून, त्याला सूज येत आहे, असेही शिक्षण क्षेत्रातील अभ्यासक ओरडून सांगतात. पण, ‘अमुक पार’, ‘तमुक पार’ वगैरेचे आकर्षण इतके वाढले आहे, की बहुतांना नव्वदीपार म्हणजे गुणवत्ता वाटू लागली आहे. ही सगळी प्रस्तावना करण्याचे कारण म्हणजे चार दिवसांपूर्वी जाहीर झालेला नॅशनल एलिजिबिलिटी कम एन्ट्रन्स टेस्ट अर्थात ‘नीट’ या परीक्षेचा निकाल आणि त्यातही भरघोस वाढलेले ‘गुण’वंत. या निकालाने मात्र अनेक प्रश्नचिन्हं आणि काही चिंता उपस्थित केल्या आहेत. त्यामुळे त्यावर चर्चा करणे महत्त्वाचे. वैद्याकीय अभ्यासक्रमांच्या पदवी प्रवेशांसाठी ‘नीट’ ही परीक्षा घेतली जाते. वैद्याकीय अभ्यासक्रमांच्या देशभरातील लाखभर जागांसाठीच्या प्रवेशासाठी ही परीक्षा होते, ज्याला यंदा सुमारे २३ लाख विद्यार्थी बसले. यंदाच्या परीक्षेचा निकाल अनेकांसाठी अजूनही ‘अनाकलनीय’ आहे. परीक्षेत ७२० पैकी ७२० गुण मिळवलेल्यांची संख्या ६७ इतकी आहे. त्यानंतरच्या प्रत्येक गुणासाठी एवढी स्पर्धा आहे, की ७२० पैकी ७०० गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीतील क्रमांक १९९३ आहे. हे अत्यंत विचित्र अशासाठी, की देशातील आघाडीच्या दिल्लीतील ‘एम्स’मध्ये १२५ जागा उपलब्ध असताना, तेथील प्रवेशासाठी प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्याला ७०० गुण मिळवूनही तेथे प्रवेशाची शाश्वती नाही. आता कोणी म्हणेल स्पर्धा असणे चांगलेच. मान्यही. पण, ती यंदाच अचानक कशी काय सुरू झाली, हा मोठा प्रश्न आहे. बरे, हे फक्त ७२० पैकी ७०० किंवा त्याहून अधिक गुण मिळवलेल्यांपर्यंत मर्यादित नाही. उदाहरणार्थ, ७२० पैकी ६४८ गुण मिळवलेल्याचा गुणानुक्रम ४०,००० च्या पुढे आहे. याचा अर्थ परीक्षेत ९० टक्के गुण मिळवूनही सरकारी वैद्याकीय महाविद्यालयात प्रवेश मिळेलच याची शाश्वती नाही.

आता हे झाले कसे, या चर्चेमध्ये पेपर फुटल्यापासून निकाल नियोजित वेळेच्या आधी लावल्यापर्यंतच्या शंका व्यक्त केल्या गेल्या आहेत. काहींनी न्यायालयातही दाद मागितली आहे. त्यामुळे यंदाच्या ‘नीट’च्या निकालाच्या परीक्षेचा ‘निकाल’ येईपर्यंत त्यावर रान उठत राहणार हे नक्की. पण, त्याही पलीकडे जाऊन एकूणच या परीक्षा व्यवस्थेची जास्त खोलात चर्चा व्हायला हवी. दहावी-बारावीला केवळ पाठांतराने, घोकंपट्टीने भरघोस गुण मिळवणे साध्य होते, असे लक्षात आल्यानंतरच बारावीनंतरच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश, हे प्रवेश परीक्षेच्या गुणांवर करण्याची व्यवस्था केली गेली. या प्रवेश परीक्षा बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्नांवर आधारित ठेवताना विद्यार्थ्याला विषयाचे नीट आकलन झाले असेल, तरच उत्तराचा अचूक पर्याय निवडता येईल, अशा पद्धतीने त्यांची रचना असणे अपेक्षित होते. थोडक्यात, ही विद्यार्थ्यांच्या आकलनाची परीक्षा असेल, असे त्यात अध्याहृत आहे. दुर्दैवाने प्रवेश परीक्षांतील उत्तरे सोडविण्याचेही तंत्र विकसित केले गेले असून, त्यातील ‘आकलनाची परीक्षा’ हा उद्देशच मार खाऊ लागला आहे.

गेल्या २०-२५ वर्षांत देशभरात जसजशा अभियांत्रिकी, वैद्याकीय, व्यवस्थापन आदी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या नवनव्या प्रवेश परीक्षा निर्माण झाल्या, तसतशी या प्रवेश परीक्षांत ‘हमखास यश’ मिळवून देणारी शिकवणी वर्गांची समांतर व्यवस्थाही निर्माण होत गेली. आता तर या परीक्षांतील यशापयश या व्यवस्थेच्या हातात असण्यापर्यंतची वेळ आली आहे. देशभरात शाखा असलेल्या अनेक शिकवणी वर्गांची आर्थिक उलाढाल काही हजार कोटींपर्यंत असणे, हे त्याचेच निदर्शक. विद्यार्थ्यांना ‘हमखास यश’ मिळवून देणाऱ्या या ‘कारखान्यां’नीच प्रवेश परीक्षा सोडविण्याचे तंत्र विकसित केले. आधीच्या काही वर्षांत आलेल्या हजारो प्रश्नांची हजारो उत्तरे चक्क पाठ करणे, हे यातील प्रमुख तंत्र! दर वर्षी आधीच्या वर्षी झालेल्या परीक्षांतील प्रश्न वेगळ्या पद्धतीने पुन्हा येत असल्याने त्यांचा व्यवस्थित सराव केला, की काम फत्ते. ज्याचा दोन वर्षांत पुरेसा सराव होत नाही, त्याला चक्क ‘ड्रॉप’ घेऊन पुढच्या वर्षीच्या परीक्षेला बसायला सांगितले जाते, तर ज्याचे गुण अपेक्षेपेक्षा कमी येतात, तोही पुन्हा एक वर्ष ‘त्याग’ करून पुन्हा ही परीक्षा देतो. अशा परीक्षा सोडविण्याचे तंत्र माहीत असलेल्या पुनर्परीक्षार्थ्यांमुळेही एकूण ‘गुण’वंतांची संख्या वाढते.

या सगळ्यात शिक्षकाने विद्यार्थ्याला संकल्पना समजावून सांगणे, त्यातील बारकाव्यांची उकल करणे, त्या संकल्पनेचे प्रत्यक्ष जीवनातील, उद्योगांतील उपयोजन रोचक पद्धतीने उलगडणे असे काही नसते. या सगळ्यामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतानाच जो आवश्यक आहे, असा खरा कस लागतच नाही. विद्यार्थी जो व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करून ज्या व्यवसायात प्रत्यक्ष जाऊ इच्छितो, त्यात करायच्या कामासाठी लागणारा कल तपासणे हाच प्रवेशासाठी स्वतंत्र प्रवेश परीक्षा घेण्यामागे उद्देश असायला हवा. तो सोडून प्रवेश परीक्षेचेच सुलभीकरण करून टाकण्याला आपण अप्रत्यक्ष मान्यता दिली आहे.

# सावळसिद्ध सोसायटीतर्फे केशर आंबा रोपांचे वाटप

### शताब्दी महोत्सवानिमित्त उपक्रम

**तासगांव :** सावळज ता. तासगाव येथील श्री सावळसिद्ध विकास सोसायटी, सावळज च्या वतीने संस्थेच्या शताब्दी महोत्सवानिमित्त सभासदांना वृक्षारोपण करण्यासाठी केशर जातीच्या आंब्याचे रोपे भेट म्हणून देण्यात आले. निवृत्त पोलीस उपनिरीक्षक आप्पासो कत्ते यांच्या हस्ते आंब्याच्या रोपाचे वाटप

## सावळसिद्ध सोसायटीतर्फे केशर आंबा रोपांचे वाटप



करण्यात आले.

यावर्षी पावसाळ्यात सुरुवातीलाच संस्थेच्या कार्यक्षेत्रात चांगल्या प्रकारचा पाऊस झाला आहे. अग्रणी नदीला पाणी आले आहे.ओढे,नालेला पाणी वाहू लागले आहे. सभासदांना वृक्षारोपण करण्यास प्रोत्साहन म्हणून संस्थेतर्फे हा निर्णय घेण्यात आलेला आहे. सावळसिद्ध विकास सोसायटी ही यावर्षी शताब्दी महोत्सव साजरा करत आहे. त्यानिमित्ताने सोसायटीच्या संचालक मंडळ नाविन्यपूर्ण विविध उपक्रम राबवत आहे. प्रत्येक उपक्रमात सभासदांचा मोठा प्रतिसाद मिळत असतो. यावेळी संस्थेचे चेअरमन दत्तात्रय पाटील व्हा. चेअरमन बाळासाहेब थोरात, ऋषिकेश बिरणे, संचालक प्रशांत कुलकर्णी,संदीप माळी, विनायक पवार, विलास तोडकर राजेंद्र वांडरे, विजय पाटील, शिवाजी पाटील,बाळासो निकम, राजेंद्र सावळजकर,, बंडू पाटील, विनेश पोळ, शिवाजी बुधवले व मोठ्या संख्येने सभासद शेतकरी उपस्थित होते.

# गेटेड बंधाऱ्यामुळे सिंचन क्षेत्र वाढणार



**तासगांव :** मृद व जलसंधारण विभागाच्या प्रकल्पांतर्गत औरंगाबाद जलसंधारण महामंडळच्या निधीतून आ. सुमनताई पाटील यांच्या प्रयत्नातून अग्रणी नदीवर सावळज व सिध्देवाडीमध्ये नुकतेच तीन गेटेड सिमेंट बंधारे बांधण्यात आले. हे बंधारे तुडुंब भरून वाहू लागल्याने भुजल पातळीत वाढ होत आहे.

या बंधाऱ्यांमध्ये पहिल्याच पावसात पाणीसाठा झाला. सिंचन क्षेत्रात वाढ होणार असल्याने शेतकरी समाधान व्यक्त करीत आहेत.

जलसंधारणामुळे भूजल पातळी वाढुन शेतीला नैसर्गिक पाणीसाठा उपलब्ध व्हावा या हेतूने गेटेड सिमेंट बंधारा संकल्पना राबविण्यात आली. ग्रामपंचायतीचा मागणी प्रस्ताव व जलसंधारण महामंडळाकडे आ. सुमनताई पाटील यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे सावळजमध्ये एक व सिध्देवाडी येथे दोन असे नुकतेच तीन बंधारे बांधण्यात आले.

सावळज येथे अग्रणी नदीवर गेटेड सिमेंट बंधारा क्रमांक ४ बांधण्यात आला.

सिध्देवाडी येथील महादेव मंदिर परिसर व यल्लामा मंदिर परिसर येथे क्रमांक १ व २ असे दोन गेटेड बंधारे बांधण्यात आले. यासाठी जिल्हा जलसंधारण अधिकारी धनंजय साहुत्रे, उपअभियंता विक्रम देसाई, शाखा अभियंता पुनम पोळ यांच्या देखरेखीखाली बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

# राष्ट्रवादी कॉँग्रेसच्यावतीने सुनेत्रा पवार यांचा राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल

**मुंबई :** राष्ट्रवादी कॉँग्रेसचे कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल यांनी दिलेल्या राजीनाम्याने रिक्त झालेल्या जागेवर पोटनिवडणूक जाहीर झाल्याने आज राष्ट्रवादी कॉँग्रेसच्यावतीने सुनेत्रा पवार यांचा राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केल्याची माहिती राष्ट्रवादी कॉँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी माध्यमांना दिली.

राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या संसदीय मंडळाची बैठक बुधवारी रात्री पार पडली. या बैठकीत एकमताने सुनेत्रा अजित पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले असेही सुनिल तटकरे यांनी सांगितले.

सुनेत्रा अजित पवार यांना उमेदवारी जाहीर केल्यानंतर चर्चा केली आणि आज अर्ज दाखल करत असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दूरध्वनीवरून दिली असल्याचेही सुनिल तटकरे यांनी स्पष्ट केले.

आज पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. त्याठिकाणी राष्ट्रवादी कॉँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल हे खासदार होते. ते पुन्हा एकदा निवडणूक लढवून खासदार झाले त्यामुळे त्यांनी राजीनामा दिलेली जागा रिक्त झाली होती. आणि म्हणून एकमताने सुनेत्रा अजित पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले त्यामुळे नाराजी असण्याचे कारणच नाही. आम्ही राष्ट्रवादी कॉँग्रेस कोअर कमिटीमध्ये बसून निर्णय घेत असतो. पक्षाच्या हिताच्यादृष्टीने आणि भविष्यात काय याचा सारासार विचार करून निर्णय घेतला गेला आहे. पक्षात कुठलीच नाराजी नाही आणि महायुतीतही नाराजी अजिबातच नाही असेही सुनिल तटकरे यांनी स्पष्ट केले.

# सावळजपुर्व भागावर निसर्ग कृपावंत

## अग्रणी नदी प्रवाहीत ; दमदार पावसामुळे शेतकरी समाधानी

**तासगाव :** अखेर सावळज पुर्वभागावर निसर्ग कृपावंत झाला आहे. गुरुवार दिवसभर व शुक्रवारी पहाटेपर्यंत तासगाव तालुक्याच्या पुर्वेकडील सावळज भागात मुसळधार पाऊस झाला. अग्रणी नदी दुथडी भरुन वाहू लागली. तब्बल सहा वर्षानंतर ठणठणीत कोरडे पडलेले अग्रणी नदीपात्र पाण्याने पुर्ण भरले आहे. यामुळे तासगाव तालुक्याच्या पुर्व भागातील शेतकरी सुखावला आहे.

२०१९-२० सालापासून अग्रणी पात्र कोरडे पडले होते. सिंचन योजनांच्या पाण्याने पात्रातील बंधारे भरुन घेतले तरच पात्रात पाणी बघायला मिळत होते. या वर्षी तालुक्याच्या पश्चिम भागात मुसळधार पाऊस पडला, परंतू पुर्वेकडील भाग पावसापासून वंचित होता. यंदाचा पावसाळाही कोरडाच जातोय असेच वाटत होते.

शुक्रवारी रात्री सावळज परिसरात दमदार पावसाला सुरुवात झाली. बघता बघता पावसाचा जोर वाढतच गेला. सायंकाळी सुरु झालेला पाऊस शनिवारी पहाटे पर्यंत व पुन्हा शनिवारी रात्रीपासून अखंड बरसत राहिला. सावळज, सिध्देवाडी, दहिवडी, जरंडी, बिरणवाडी, वायफळे आणि परिसरातील गावांमध्ये मुसळधार पाऊस झाला. सावळज पूर्व भागासाठी वरदान असणाऱ्या सिद्धेवाडी व अंजनी तलावात पाणीपातळी झपाट्याने वाढत आहे.

रात्रभर पडलेल्या पावसाने शेतात बघेल तिकडे पाणीच पाणी दिसत आहे. ताली भरल्या आहेत, ओढे, नाले भरुन वाहू लागले. पुर्व भागातील अग्रणी नदी पात्रही भरुन वाहू लागले आहे. अग्रणी नदी पात्रात पाणी बघितल्यावर सहा वर्षे कोरडे पात्र बघणा-या शेतक-यांच्या डोळ्यातही आनंदाश्रू पहायला मिळत आहेत.

गेल्या चार पाच महिन्यापासून द्राक्ष बागांना पाणी मिळावे या मागणीसाठी शेतकरी टाहो फोडत होता. प्रशासनाकडून टंचाईग्रस्त भागांना पाणी मिळावे अशी विनवणी करणाऱ्या शेतकऱ्याची अखेर निसर्गालाच दया आली. टंचाईग्रस्त शेतकऱ्यांना अखेर निसर्गाची साथ मिळाल्यामुळे समाधान व्यक्त केले जात आहे. तूर्तास तरी या भागाचा पाणी प्रश्न मिटल्याचे चित्र दिसत आहे. यंदाच्या द्राक्ष हंगामाची काळजी मिटल्यामुळे शेतकरी वर्गाकडून आनंद व्यक्त होत आहे.

# लोकसभेचा निकाल लागल्यापासून दुष्काळी भागात पाऊस हा शुभ संकेत : खा. धैर्यशील मोहिते पाटील

**सातारा :** महाविकास आघाडीचे माढा लोकसभा मतदारसंघांमध्ये जनतेने निवडणूक हाती घेतल्यामुळे विजय सोपा झाला. आता जबाबदारी वाढली असून निकाल लागल्यापासून दुष्काळी भागात पाऊस कोसळत आहे हे शुभ संकेत असल्याचे मत माढा नवनिर्वाचित खासदार मोहिते पाटील यांनी सातारा येथील राष्ट्रवादी भवन मध्ये पत्रकारांशी संवाद साधताना व्यक्त केले. यावेळी त्यांच्या समवेत राष्ट्रवादी सातारा जिल्हाध्यक्ष सुनील माने, आमदार बाळासाहेब




पाटील, राष्ट्रवादी सरचिटणीस राजकुमार पाटील , राष्ट्रवादी महिला प्रदेश उपाध्यक्ष समिंदरा जाधव, नलिनी जाधव, भारती काळंगे, डॉ. नितीन सावंत, जाबीर बेपारी, जमील बेपारी, दिलीप बाबर, मकरंद बोडके, स्वप्निल वाघमारे, पारिजात दळवी शहाजी शिरसागर, विजय बोबडे ,शफिक शेख, उद्धव बाबर आदी मान्यवर उपस्थित होते .

या वेळेला नूतन खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांचा राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या वतीने शाल- श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला. लोकसभा मतदारसंघात आदरणीय शरदचंद्र पवार साहेब, माजी मंत्री श्री विजयसिंह मोहिते पाटील, पक्षप्रमुख राहुल गांधी, उद्धव ठाकरे यांच्या आशीर्वादाने व जनतेने मोलाची साथ दिल्यामुळे हा जनतेचा विजय आहे. मतदार संघातील सिंचनाचा व रेल्वेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून यशस्वी प्रयत्न करणार आहे. विशेष बाब म्हणजे संपूर्ण भारत देशामध्ये रस्त्याचे जाळे निर्माण करणारे मंत्री नितीन गडकरी यांची उमेदवारी भाजपच्या तिसऱ्या यादीमध्ये आली. आणि माढा तील भाजप निष्क्रिय खासदार यांचे नाव मात्र पहिल्याच यादीत आले होते. असे त्यांनी सुचित केले. माढा लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघात विकास कामे करून सर्वांना न्याय देण्याची भूमिका घेतली जाणार आहे. असे त्यांनी स्पष्ट केले.

# साताऱ्यात तिरंगा ध्वजबाबत काही भगव्याधारी प्रशासनाकडे चौकशीची मागणी

**सातारा :** सारे जहाँ से अच्छा.. हिंदुस्तान हमारा.. असं वर्णन केलेल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली. आज सर्वत्र तिरंगा ध्वज फडकवून देश अभिमान दाखवला जात आहे. परंतु, सातारा जिल्ह्यातील तांदुळवाडी ता. कोरेगाव या ठिकाणी प्रजासत्ताक दिनी तिरंग्याचा अपमान करून भगवा ध्वज फडकवण्यात आला. या विरोधात जागरूक नागरिक आंदोलन करत आहेत. त्याची दखल घेत नसल्यामुळे तिरंगा ध्वजाच्या अवमनाबाबत तातडीने चौकशीची मागणी काही भगव्याधारी प्रशासनाकडे केली जात आहे. अशी चर्चा रंगू लागलेली आहे.

याबाबत माहिती अशी की, भारतीय प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी २०२४ रोजी तांदुळवाडी ता. कोरेगाव या ठिकाणी तिरंगा ध्वज फडकवणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. असे असताना कोरेगावचे



**सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनासाठी बसलेले संदीप जाधव यांच्यासह मान्यवर (छाया- निनाद जगताप, सातारा)**

भाजपचे विद्यमान आमदार यांची पत्नी यांनी चक्क तिरंगा ध्वजाला दुय्यम स्थान देऊन व अपमान करून प्रथम जाहीरच्या भगवा ध्वज फडकवला.

सदरच्या घटनेबाबत सामाजिक कार्यकर्ते संदीप जाधव यांनी शासकीय कर्मचारी यांना याबाबत यापूर्वी सूचना दिली होती. त्यामुळे ते सदर घटनेमुळे उपस्थित राहिले नाहीत. अशी त्यांनी कबुली दिली. तांदुळवाडी ग्रामपंचायतचे सरपंच व इतर सदस्य व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. याबाबत तातडीने सामाजिक कार्यकर्ते संदीप जाधव यांनी दिनांक २३ फेब्रुवारी २०२४ रोजी तसेच २८ फेब्रुवारी रोजी याबाबत चौकशी करून कारवाई व्हावी. असे निवेदन दिले होते. त्यानंतर ते दिनांक १० जून रोजी सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसलेले आहेत. जगात भगवा सर्वश्रेष्ठ आहे. परंतु भारत देशाचा विचार केला तर तिरंगा ध्वज हा सर्व धर्मापेक्षा श्रेष्ठ ध्वज आहे. दुसरी बाजू म्हणजे तांदुळवाडी गावामध्ये समाज मंदिर बांधण्यात आले होते. हे समाज मंदिर कर्तव्यदक्ष व कर्तबगार आमदार शंकरराव जगताप यांच्या कारकिर्दीमध्ये झाले असल्यामुळे या समाज मंदिराचा वापर होऊ नये. यासाठी प्रयत्न केला जात असल्याचाही आरोप करण्यात आला. या समाज मंदिराचा वापर होत नसल्याने शासकीय कामात अडथळा आणण्याचा गुन्हा दाखल होऊ शकतो.

परंतु, भगव्या विचाराने ग्रासलेल्या काही लोकप्रतिनिधी व शासकीय कर्मचाऱ्यांमुळे या गोष्टीकडे दुर्लक्ष केले जात आहे. सध्या कोणत्याही धार्मिक समूहाला विरोध नसून आम्ही सर्वप्रथम संविधानाला मान्यता देतो. कारण संविधानामुळेच लोकप्रतिनिधींना व शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांना अधिकार मिळालेला आहे. हा कुठल्याही धार्मिक ध्वजामुळे मिळालेला नाही. याची आता आठवण करून द्यावी लागत आहे. सदर प्रकरणाबाबत फारशी दखल घेतली जात नसल्यामुळे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सामाजिक कार्यकर्ते संदीप जाधव व त्यांचे सहकारी निषेध व्यक्त करीत आहेत.

वास्तविक पाहता मानवता दृष्टिकोन ठेवून अनेक भगवेधारी मंडळी माणुसकी जपत असल्यामुळेच भारत देश जगात अखंड राहिलेला आहे. त्याला गालबोट लावण्याचे कृत्य काही अंधभक्त व स्वतःच्या स्वार्थासाठी भगव्याचा वापर करणाऱ्या प्रवृत्ती सातारा जिल्ह्यात वाढू लागल्यामुळेच आम्ही आंदोलन करत आहेत. यामागे कुठल्याही धार्मिक व ध्वजाचा अवमान करणे असं आमच्या रक्तात नाही. कारण, आम्ही संविधान मानतो. संविधानानेच आम्हाला आंदोलनाचा अधिकार दिलेला आहे त्याच पद्धतीने सर्व धर्माचे रक्षण करण्याचे अधिकार दिलेला आहे.

भगव्याचे रक्षण व्हावे म्हणून हे आमचे आंदोलन आहे. तिरंग्याचा मान राखला जावा. यासाठीच आमचे आंदोलन असल्याची माहिती आंदोलक संदीप जाधव तसेच लढाऊ पँथर विश्वास मोरे, साहित्यिक व ज्येष्ठ पत्रकार अनिल वीर, प्रा. विलास वहागावकर, दंगलकार कवी नितीन चंदनशिवे, एडवोकेट विजयानंद कांबळे, रमेश उबाळे, वैभव गायकवाड, शुभम बल्लाळ, पृथ्वी राजे निंबाळकर, अजित वाघमारे आदी मंडळींनी या प्रकरणाची चौकशी व्हावी अन्यथा आम्हीही आंदोलन करू असा इशारा दिलेला आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902



# ज्येष्ठ नागरिक संघ संचालक मंडळाची मासिक सभा उत्साहात

**नारायणगाव :** जुन्नर तालुक्यातील श्री मळगंगा ज्येष्ठ नागरिक संघाच्या संचालक मंडळाची मासिक सभा धोलवड (ता. जुन्नर) येथे नुकतीच उत्साहात पार पडली.

सभेच्या अध्यक्षस्थानी हिवरे बुद्रुक येथील आनंद ज्येष्ठ नागरिक संघाचे संस्थापक अध्यक्ष किसनराव आरोटे होते. याप्रसंगी श्रीराम ज्येष्ठ नागरिक संघ पिंपळगाव तर्फे नारायणगावचे अध्यक्ष शिवाजीराव लक्ष्मण गावडे पाटील, उपाध्यक्ष रामदास वऱ्हाडी, सचिव शशिकांत बेल्हेकर आदी मान्यवर उपस्थीत होते.

मळगंगा जेष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष रखमाजी धोंडीभाऊ नलावडे ,संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक दामोदर लक्ष्मण नलावडे, कैलासराव रघुनाथ नलावडे गुरुजी, गावातील इतर जेष्ठ नागरिक ज्येष्ठ महिला आदी मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते.

यावेळी किसनराव आरूटे यांनी मुख्यमंत्री वयश्री योजनेच्या ६५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना योजनेचे स्वरूप त्यांच्या शारीरिक असमर्थता दुर्बलतेनुसार सहाय्यभूत साधने उपकरणे खरेदी करता येतील असे सांगितले. तसेच चष्मा, श्रवण यंत्र, फोल्डिंग वॉकर, नि ब्रश, लंबर बेल्ट, सर्व कॉलर आदी साहित्याची माहिती दिली. संघाचे संस्थापक दामोदर नलावडे यांनी जेष्ठ नागरिकांच्या ६५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांचे वय ६० वर्ष करण्यात यावे, ज्येष्ठ नागरिकांना १४ व १५ व्या वित्त आयोगाच्या योजनेची माहिती ग्रामपंचायत कडून मिळावी, प्रत्येक ज्येष्ठ नागरिकांना पेन्शन म्हणून दर महिना पाच हजार रुपये मिळावे, संघांना विरंगुळा केंद्रासाठी शासनाकडून निधी मिळावा, प्रत्येक ज्येष्ठ व्यक्ती संविधानिक रित्या सर्वसामाजिक व्यवस्था सेवेच्या विशेष दर्जासाठी सामाजिक व्यवस्था ज्येष्ठ नागरिकांच्या गरजा आणि क्षमता लक्षात घेऊन वेगळ्या व अतिरिक्त स्वरूपात स्थापित केल्या जाव्यात अशी मागणी केली.

केंद्र सरकारने महाराष्ट्र हेल्पलाइनचज अधिकारी रवींद्र कदम यांनी १४५६७ असी हेल्पलाइन दिली आहे. ज्या ज्येष्ठांना अती अडचणीची गरज भासल्यास व इतर अनेक अडचणींसाठी या हेल्पलाइनवर संपर्क करण्यास तात्काळ सेवा दिली जाते, असे सांगितले.

ज्येष्ठ नागरिकांच्या अडचणीमध्ये आज काल वाढ होत चालली आहे घरातल्या घरात जेष्ठ व्यक्तीबरोबर कोणीही बोलत नाही घरात जेष्ठ नागरिक हा डस्टबीन डबा झाला आहे, आपल्या परिसरातील जो कोणी जेष्ठ आहे त्याला कोणीही सांभाळत नाही त्यांना उदरनिर्वाह भत्ता चालू केला पाहिजे, अशा अनेक माहिती संदर्भात श्री मळगंगा जेष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष व संस्थापक अध्यक्ष दामोदर नलावडे यांनी माहिती घेऊन समाधान झाले असे सांगितले,

सर्व ज्येष्ठ नागरिकांनी आमच्या शंकाचे चांगल्या प्रकारे निरसन झाले असल्याचे सांगितले.

उपस्थितांचे उपाध्यक्ष रखमाजी नलावडे, संस्थापक अध्यक्ष दामोदर नलावडे व उपाध्यक्ष रखमाजी नलावडे यांनी श्रीफळ देऊन पाहुण्यांचा सत्कार केला व खेळीमेळीच्या वातावरणामध्ये सभा पार पडली व, पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# साताऱ्यात दलित - अल्पसंख्याकांविना राष्ट्रवादीला लाभणार राज्यसभा सदस्यत्व

**सातारा :** छत्रपतींची राजधानी असलेल्या सातारा जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आ. शशिकांत शिंदे यांचा निसटता पराभव झालेला आहे. खरं म्हणजे त्यांच्या हक्काचा विजय हिसकावून घेण्यामध्ये सातारा लोकसभा मतदारसंघातील मतदार पैकी अल्पसंख्याक व दलित समाजाची मत कारणीभूत आहेत. त्यामुळे भाकरी पलटी केली नाही तर करपते या न्यायाप्रमाणे महायुती मधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने राज्यसभा सदस्य देताना दलित व अल्पसंख्याकांचा विचार करावा. तसे न करता त्यांना डावलण्याची शक्यता राजकीय निरीक्षक उघडपणे बोलू लागलेले आहेत.

दरम्यान सर्वांना सोबत घेऊन जाणाऱ्या मराठा समाजाला संधी दिला तर अधिक आनंद होईल असं महायुतीत काम करणाऱ्या दलित व अल्पसंख्याक कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त केले.

साडेतीन जिल्ह्याचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अशी टीका करणाऱ्या भाजपचे नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या एका गटाने चक्री व्याजासह राजकीय परतावा मुद्दलसह दिलेला आहे. त्यामुळे सध्या देवेंद्र फडणवीस यांची बाजू मांडण्यासाठी निदान सातारा जिल्ह्यातील महायुती मधील कुणी खासदार- आमदार- मंत्री प्रयत्न करत नाहीत. त्यामुळे भाजपमध्ये मोठ्या प्रमाणात महायुतीच्या घटक पक्षाबद्दल नाराजी पसरलेले आहे.

महायुतीचे माण-खटाव वगळता तसेच राखीव मतदार संघ म्हणून फलटणमध्ये आमदार दीपक चव्हाण आहेत. सातारा जिल्ह्यात भाऊसाहेब गुदगे, शंकरराव जगताप ,शामराव अष्टेकर, संपतराव अवघडे, धोंडीराम वाघमारे अशी विविध जातीचे आमदार होऊन गेले.

विधान परिषदेचा विचार केला तर पद्मश्री लक्ष्मण माने , कॅप्टन आर.डी. निकम, सदाशिव पोळ, महादेव जानकर या साताऱ्च्या सुपुत्रांना संधी मिळाली.

आता राजकीय उलथापालथ झाल्यामुळे सातारा जिल्ह्यामध्ये मतदारांच्या हातात कुणाला आमदार करायचं या पाळण्याची दोरी हाती आलेली आहे. राष्ट्रवादी सोबतच शिवसेनेतही फरक पडलेली आहे. वाईचे आमदार मकरंद पाटील, माजी आमदार मदन भोसले व शिवसेना मुख्यमंत्री गटाचे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम जाधव, रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोकराव गायकवाड व त्यांचे सहकारी महायुतीचे घटक पक्ष आहेत. सातारा लोकसभा मतदारसंघाच्या प्रचार यंत्रणेत कमी पडलेले आहेत. तरीही उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादीचे नेते अजितदादा पवार गटाच्या कार्यकर्त्यांना खुश ठेवण्यासाठी राज्यसभेचे सदस्यत्व देण्याचा शब्द दिला होता. परंतु हा शब्द पाळला तर आगामी विधानसभा निवडणुकीत दलित- भटक्या विमुक्त जाती जमाती- अल्पसंख्यांक हे मतदार नाराज होतील. या नाराजीचा पुन्हा फटका महाविकास आघाडीला बसेल. असे आता सांगण्यात येत आहे. विशेष बाब म्हणजे मराठा समाजाने आतापर्यंत गावगाडा व्यवस्थितरित्या सुरू ठेवला आहे. त्यामधील पुरोगामी विचारांच्या मराठा नेतृत्वाला पुढे आणण्यासाठी त्यांना राज्यसभेचे सदस्यत्व देणे. हा त्यांचा अधिकार आहे. तो आम्हालाही मान्य आहे. असे काही कार्यकर्त्यांनी सांगितले.

### देर आया..... दुरुस्त आया....

**या न्यायाप्रमाणे पक्षाच्या स्थापनेपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी झटणारी विविध समाजातील समाजातील निष्ठावंत कार्यकर्त्याला संधी दिली तर विधानसभेच्या निवडणुकीत खऱ्या अर्थाने फुले- शाहू -आंबेडकरांच्या विचाराचा विजय होणार आहे. हे सांगण्यासाठी ज्योतिषाची गरज नाही. असं भाकित वर्तवण्यात येत आहे . दरम्यान, सातारा जिल्ह्यातील वाई- खंडाळा- महाबळेश्वर, सातारा- जावळी, कोरेगाव व आरक्षित असलेल्या फलटण या चार मतदारसंघात दलित अल्पसंख्याक व इतर मागासवर्गीयांची संख्या लक्षणीय आहे. त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यामुळे राज्यसभेत सदस्यांसाठी महायुतीतील घटक पक्ष काय निर्णय घेतात ?याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बारामतीच्या पराभूत उमेदवार सौ .सूनेत्रा अजित पवार यांना राज्यसभेवर संधी देण्यात आलेली आहे. आता लोकसभेच्या निवडणुकीतून उमेदवारी अर्ज दाखल करून माघार घेणाऱ्यांना संधी दिली तर राज्यसभा म्हणजे माघारी घेणारे व पराभूत उमेदवारांचे पुनर्वसन केंद्र अशी त्याची ओळख होण्याची शक्यता आहे. असे उघडपणे बोलू लागलेले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे सातारा जिल्ह्यामध्ये चांगले वजन आहे त्यांच्याकडे खासदारकीसाठी अनेक चेहरे आहेत परंतु त्यांनी दिलेला शब्द व शब्दाला जाणारे राजकारण जर झाले तर त्या दृष्टीने निश्चितच नितीन पाटील यांचा विचार होईल हे सुद्धा यानिमित्त अधोरेखित करावे वाटत आहे.**

## टँकर भरण्यासाठी सोलार पंप आणि साठवणुकीच्या टाक्यांना सरकारकडून मान्यता

**मुंबई :** राज्यात अनेक ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा सुरु असून अनेक ठिकाणी विजेच्या लपंडावामुळे टँकर भरताना अनेक अडचणींचा सामाना करावा लागतो. यावर अखेर तोडगा निघाला आहे. यासाठी राज्य सरकारकडून टँकर भरण्यासाठी सोलार पंप आणि साठवणुकीच्या टाक्या बसविण्याची मागणी मान्य करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे राज्यातील पाण्याची उपलब्धता आणि पर्जन्यमान आढावा बैठक पार पडली. त्यात शासनाने महसूल मंत्री विखे पाटील यांच्या मागणीला मान्यता दिली असून, याची कार्यवाही करण्याचे अधिकार जिल्ह्याधिकारी यांना देण्यात आले असल्याचे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. यामुळे दुष्काळी भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# भोर तालुक्यातील २० हजार विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक वाटप

**भोर :** सर्व शिक्षण अभियानांतर्गत भोर तालुक्यात शहरासह ग्रामीण भागातील पहिली ते आठवीच्या एकूण १९ हजार ५२९ विद्यार्थ्यांना यंदा मोफत पाठ्यपुस्तक योजनेचा फायदा होणार आहे. सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी म्हणजे १५ जूनला पाठ्यपुस्तके देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

येत्या शनिवारी १५ जूनला सुरू होणाऱ्या नवीन शैक्षणिक वर्षात शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक मिळावेत या दृष्टीने शिक्षण विभागाने नियोजन केले.भोर तालुक्यात३२५ शाळांना याचा लाभ होणार असून जिल्हा परिषद शाळा -२७४, अनुदानित खाजगी शाळा, नगरपालिका -३, आश्रम शाळा -२ तसेच समाज कल्याणच्या एका शाळेला विभागामार्फत पाठ्यपुस्तके वितरीत करण्यात आली आहेत.

बहुतांशी शाळांची वर्ग स्वच्छता शालेय स्वच्छता करून घेतली गेली आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी स्थानिक लोकप्रतिनिधी, पालक, ग्रामस्थ, अधिकारी शाळेत जाऊन मुलांचे स्वागत करून पाठ्यपुस्तकांचे वाटप करनार आहेत. तर शाळेत विद्यार्थ्यांची शंभर टक्के उपस्थिती ठेवण्यासाठी शिक्षक वृंद दोन दिवसांपासून गावात जाऊन पालकांच्या गाठीभेटी घेत आहेत. येत्या दोन दिवसात यंदाच्या शैक्षणिक वर्षातील शाळा सुरू होणार असल्याने मागील वर्षी शाळांमध्ये असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये आनंद व्यक्त होत आहे तर नवीन पहिल्यांदाच शाळेत जाणाऱ्या चिमुकल्यांमध्ये धाकधुकीचे वातावरण आहे.

पाठ्यपुस्तके वितरण करण्याचे नियोजन विषय तज्ञ सुनील गोरड, तानाजी तारू, प्रकाश बदक, विजय खुटवड , संतोष देशमुख, अंजली अहिरे, सुरेखा राजवडे, लता वाघोले यांनी इयत्ता व भाग निहाय केले.

### आनंददायी उपक्रम राबविला जाणार

**शाळा पूर्वतयारी पूर्ण झाली आहे. पहिल्या दिवशी आनंददायी उपक्रम राबवले जाणार असून नवागतांचे स्वागत गावातून प्रभात फेरी काढून पुष्पगुच्छ देत करण्यात येणार आहे. विद्यार्थी १०० टक्के उपस्थित होण्यासाठी पालकांमध्ये जनजागृती केली गेली आहे असे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती भोर राजकुमार बामणे यांनी सांगितले.**

# शनिवारी पाटण येथे महाविकास आघाडीचा आभार मेळावा

**पाटण :** नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पाटण विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचा मेळावा शनिवार दि.१५ जून २०२४ रोजी पाटण येथील डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम सभागृह(बा.दे.कॉलेज) येथे पार पडणार आहे. यावेळी आ.शशिकांत शिंदे, आ.बाळासाहे पाटील, पक्षाचे जेष्ठ नेते, माजी मंत्री . विक्रमसिंह पाटणकर, श्रमिक मुक्ती दलाचे अध्यक्ष डॉ.भारत पाटणकर,



सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक. सत्यजितसिंह पाटणकर, सातारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार अध्यक्ष .सुनील माने, उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना जिल्हा अध्यक्ष हर्षद उर्फ भानुप्रताप कदम, राष्ट्रीय काँग्रेसचे प्रांतिक प्रतिनिधी .हिंदुराव पाटील व महाविकास आघाडीतील मित्र पक्षांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत अशी माहिती पाटण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार चे अध्यक्ष राजाभाऊ शेलार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

या मेळाव्यामध्ये लोकसभा निवडणुकीत आलेल्या अपयशाची कारणमिमांसा करण्यात येणार आहे, त्याचबरोबर आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर चर्चा करण्यात येणार आहे.

तरी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार पक्ष, राष्ट्रीय काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, शेतकरी कामगार पक्ष आणि महाविकास आघाडीतील घटक मित्र पक्षांच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी यावेळी उपस्थित रहावे अशी विनंती शेलार यांनी प्रसिद्धी पत्रकात शेवटी केली आहे.

# माझ्या चेहऱ्यावर कुठे नाराजी दिसतेय का : भुजबळ

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघात दीड लाख मतांनी पराभूत झालेल्या सुनेत्रा पवारांना राष्ट्रवादी काँग्रेसनं राज्यसभेवर संधी दिली आहे. लोकसभेतील पराभवाला १० दिवस उलटत नाहीत तोच राष्ट्रवादीनं सुनेत्रा पवारांना राज्यसभेवर पाठवलं आहे. त्यांनी विधिमंडळात जाऊन राज्यसभेचा उमेदवारी अर्ज भरला. राष्ट्रवादीकडून अजित पवारांच्या कुटुंबाला देण्यात आलेल्या झुकत्या मापाबद्दल विचारलं असता, हा निर्णय पक्षाचा असल्याचं त्यांनी सांगितलं. पक्षाच्या निर्णयावर मी नाराज नाही. माझ्या चेहऱ्यावर कुठे नाराजी दिसतेय का, असा प्रतिप्रश्न भुजबळांनी पत्रकारांना केला.

अजित पवार उपमुख्यमंत्री आहेत. त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवारांना राष्ट्रवादीनं लोकसभेची उमेदवारी दिली. निवडणूक त्या पराभूत झाल्या. त्यानंतर लगेचच त्यांना राज्यसभेवर संधी दिली जातेय. अजित पवार कुटुंबात सगळी पदं देत आहेत. हे योग्य वाटतं का? असा प्रश्न पत्रकारांकडून भुजबळांना विचारण्यात आला. 'अजित पवारांनी कुठे काय म्हटलं?

पक्षाच्या मंत्र्यांनी सुनेत्रा पवारांना राज्यसभेवर पाठवण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय आम्हा सगळ्यांचा आहे,' असं भुजबळ म्हणाले. राजकीय पक्षात सगळ्यांनी मिळून निर्णय घ्यायचे असतात. मी शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादीत काम केलं आहे. सगळीकडे मी हीच गोष्ट शिकलो. सगळ्या गोष्टी आपल्या मनाप्रमाणे होत नाहीत. पक्ष निर्णय घेत असतो. तो सगळ्यांना मान्य करावा लागतो. माझ्या मनाप्रमाणे निर्णय घ्यायला मी अपक्ष थोडीच आहे. पक्ष ठरवेल त्याप्रमाणे वागावं लागतं. काही निर्णय घ्यावे लागतात, असं भुजबळांनी सांगितलं. राज्यसभेसाठी तुमच्या नावाची चर्चा होती. पण तुम्ही ज्येष्ठ असूनही तुम्हाला डावलण्यात आलं. अजित पवारांच्या पत्नी आणि लोकसभेला पराभूत झालेल्या सुनेत्रा पवारांना संधी देण्यात आली. याबद्दल नाराज आहात का? असा प्रश्न भुजबळांना विचारला गेला.

त्यावर माझ्या चेहऱ्याकडे पाहून मी नाराज आहे असं वाटतंय का, असा प्रतिप्रश्न भुजबळांनी केला. लोकसभा निवडणुकीत अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार बारामती मतदारसंघात पराभूत झाल्या. बालेकिल्ल्यात पत्नीचा पराभव झाल्यानं अजित पवारांवर मोठी नामुष्की ओढावली. अजित पवारांच्या कुटुंबातील व्यक्ती लोकसभा निवडणुकीत पराभूत होण्याची ही दुसरी वेळ आहे. गेल्या निवडणुकीत त्यांचे चिरंजीव मावळमध्ये २ लाखांहून अधिक मतांनी शिवसेनेच्या श्रीरंग बारणेंकडून हरले होते.

# अजित पवार लवकरच राज्यव्यापी दौरा काढणार

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या निराशाजनक कामगिरीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष चांगलाच कामाला लागला आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार लवकरच राज्यव्यापी दौरा काढणार असून पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरेही १९ जूनपासून तीन दिवसीय दौरा करणार आहेत. निवडणुकीच्या काळात अजित पवार यांना जाणीवपूर्वक लक्ष्य करण्यात आले आणि त्याला उत्तर देण्यात आम्ही कमी पडलो आणि विरोधकांना त्यात यश मिळाले, या गोष्टीही विचारात घेऊन आम्ही पुढील नियोजन करत आहोत, असेही तटकरे यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रवादी काँग्रेसने आता विधानसभा निवडणुकीवर लक्ष केंद्रित केले असून 'एकच लक्ष्य विधानसभा क्षेत्र' हे घोषवाक्य घेत प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी १९ जून ते २१ जून दरम्यान राज्यव्यापी दौऱ्याची बुधवारी घोषणा केली.

दौऱ्याची सुरुवात शरदचंद्र पवार पक्षाचा वर्धापनदिन झाला त्या अहमदनगर येथूनच होणार असून सलग तीन दिवसांच्या या दौऱ्यादरम्यान वेगवेगळ्या राजकीय लोकांचे पक्षप्रवेशही होणार आहेत. शेतकऱ्यांच्या मनात कांदा, सोयाबीन, कापूस हे सर्व प्रश्न एकाचवेळी निर्माण झाले आणि त्याचा परिणाम लोकसभेच्या निवडणुकीत अपेक्षित यश मिळाले नाही याची जाणीव असल्याचे सुनिल तटकरे यांनी सांगितले.

लोकसभा निवडणुकीत एक नकारात्मक भावना निर्माण करण्यात आली. काही ठिकाणी सहानुभूती अनुभवण्यात आली, असे तटकरे म्हणाले.

## नागपुरातील विद्यार्थ्याचा वाढदिवशीच अंत

**नागपूर :** नागपूरात पब्जी गेम खेळण्याचे व्यसन एका विद्यार्थ्याच्या मृत्यूचे कारण ठरले आहे. नागपूरच्या अंबाझरी तलावात असलेल्या पंप हाऊसमध्ये ही घटना घडली असून, पब्जी गेम खेळणाऱ्या या विद्यार्थ्याचा पंप हाऊसच्या पाण्यात बुडून मृत्यू झाला. घटनेच्या दिवशी विद्यार्थ्याचा वाढदिवस होता आणि वाढदिवस साजरा करण्यासाठी तो आपल्या एका मित्रासोबत अंबाझरी तलावावर पोहोचला होता.

मिळालेल्या माहितीनुसार, जरीपटका येथील पुलकित राज शहदादपुरी (वय १६) असे विद्यार्थ्याचे नाव आहे. ११ जून रोजी पुलकितचा वाढदिवस होता. वाढदिवस साजरा करण्यासाठी तो ऋषी खेमाणी या मित्रासोबत नाश्ता करण्यासाठी शंकर नगर चौकात गेला होता. तेथे पोह्याचे दुकान बंद असल्याने दोघेही अंबाझरी तलावाकडे फिरायला गेले. पंप हाऊसमध्ये बनवलेल्या जाळीच्यामध्ये असलेल्या खड्ड्यातून पुलकित खाली पडला.

# अबकी बार' वाले कुठे गेले : उद्धव ठाकरे

**मुंबई :** जम्मू-काश्मीरमध्ये तीन दिवसांत तीन दहशतवादी हल्ले झाले. ही जबाबदारी कोणाची आहे, असा सवाल ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी 'अब की बार'वाले कुठे गेले असा टोला ी भाजपला हाणला. देशात सातत्याने दहशतवादी हल्ले होते आहे. मणिपूर इतक्या दिवसांपासून धुमसत आहे, पण सत्ताधाऱ्यांपैकी कोणीच तिकडे जात नसल्याचेही ते म्हणाले.



जम्मू-काश्मीरमध्ये यात्रेकरुंवर हल्ला झाला, त्यात १८ जणांना आपला जीव गमवावा लागला. यापार्श्वभूमीवर मातोश्रीमध्ये पत्रकारांशी संवाद साधताना ठाकरे यांनी भाजपवर निशाणा साधला. यावेळी त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर तोफ डागली. गेल्या ४८ तासांत काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी डोके वर काढले आहे. तीन ठिकाणी हल्ले झाले आहेत. तर चकमकीत दोन दहशतवादी ठार झाले आहेत.

या भागातील परिस्थिती पाहता सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असल्याचे त्यांनी सांगितले. मणिपूर एका वर्षांपासून जळत असल्याचे सांगत, त्यांनी याप्रकरणी सत्ताधाऱ्यांपैकी कोणीच त्या भागात गेले नसल्याचा आरोप केला.

मणिपूरच्या विषयावर काल रा.स्व. संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी सरकारचे कान टोचले होते. त्यावर ठाकरे यांनी भागवत यांना चिमटा काढला. निदान वर्षभराने भागवत या विषयावर बोलले तरी, असे ठाकरे म्हणाले. लोकसभा निवडणुकीत भाजपने जम्मू-काश्मीरचा मुद्दा प्रचारात आणला होता. ३७० कलम हटविल्याचे प्रचार सभेत सांगण्यात येत होते. त्याचा संदर्भ देत उद्धव ठाकरे म्हणाले की, कलम ३७० हटविल्याचा या लोकांनी ढोल बडवला.

मात्र तिथले सत्य काय हे आम्ही जनतेसमोर आणले. त्यावर हे लोक आता काहीच बोलणार नाहीत. हे कलम हटवून काय फरक पडला असा सवाल त्यांनी केला. तिकडे लोकांचे जीव जात असताने हे लोक तिसऱ्यांदा सरकार आणल्याची जाहिरात करण्यात व्यस्त असल्याचा आरोप त्यांनी केला. आता पंतप्रधान, गृहमंत्री जम्मू-काश्मीरला जाणार का असा सवाल त्यांनी केला.

मोदींना देश सांभाळता येत नसेल तर त्यांना पंतप्रधान पदावर बसण्याचा अधिकार नाही, असेही ते म्हणाले. जम्मू कश्मिरमध्ये ३७० कलम हटवूनही काश्मीरमध्ये शांतता आलेली नाही, हे गृहमंत्र्यांचे अपयश आहे. पुन्हा त्यांना गृहमंत्री पद दिल्यावर हल्ले सुरू झाले आहेत. अमित शहा भ्रष्टाचारांना आपल्या पक्षात घेतात. परंतु काश्मिरी पंडितांना त्यांच्या घरी पाठवू शकले नाहीत. असा गृहमंत्री नरेंद्र मोदींनी आमच्या देशाच्या छातीवर बसविला आहे. देशाच्या असंख्य शहिदांचा अपमान केलेला आहे, असे सांगत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतांनी भाजपवर टीका केली.

# ४०० वर्षे जुना ऐतिहासिक वटवृक्ष उन्मळला....पण असे होणार जतन

## पर्यावरण प्रेमी, जिल्हा परिषद करणार जतन ; ७०० वटवृक्ष लावून करणार जनुकीय जतन



**सांगली :** रत्नागिरी-नागपूर महामार्गावरील भोसे (ता. मिरज) येथील यल्लमा मंदिरासमोरील सुमारे चारशे वर्षांपासून उभा असलेला विशालकाय वटवृक्ष सोमवारी उन्मळून पडला. दाट व शीतल छाया देत वाटसरुंची सेवा करणारा, निसर्गप्रेमींच्या डोळ्यांना सुखावणारा, घनदाट जंगलातील अजस्त्र वृक्षांशी स्पर्धा करणारा इतिहासाचा साक्षीदार असलेला हा वृक्ष कोसळल्याने वृक्षप्रेमी हळहळले. गावाची शोभा गेली म्हणून ग्रामस्थांचे डोळे पाणावले.

काही वर्षांपूर्वी महामार्गाच्या कामासाठी महामार्ग प्राधिकरणाने हा वटवृक्ष हटविण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाविरोधात भोसे ग्रामस्थांसह वृक्षप्रेमींनी आंदोलन उभारले.

चित्रपट अभिनेत्यांपासून राज्यभरातील अनेक नेत्यांनीही या आंदोलनाला पाठींबा देत हा वटवृक्षाला जिवंत ठेवण्याचा लढा यशस्वी केला. तत्कालिन रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी हा वटवृक्ष वाचविण्यासाठी रस्त्याची दिशा बदलाण्याचे आदेश दिले होते.

महामार्गाची दिशा बदलली पण, याच महामार्गाच्या कामामुळे या झाडाच्या मुळांना इजा पोहचली. पाणी साचून झाडाला जखडून ठेवलेली जमिन खचली. त्यातच सतत पाऊस पडत असल्याने अखेर मुळांसह वटवृक्ष जमिनीवर उन्मळून पडला. ही बातमी पसरताच ग्रामस्थांनी मंदिराजवळ गर्दी केली. साऱ्यांच्या ह्रदयात कालवाकालव झाली. वृक्षप्रेमींनी येऊन त्याच्या पुनर्रोपणाबाबतचा आढावा घेतला. पण, त्यांना कोणतीही आशा दिसली नाही. अखेर निसर्गप्रेमी कार्यकर्त्यांनी एकत्र येत या साक्षीदाराच्या स्मृती जपण्याचा निर्णय घेतला. यावेळी प्रवीण शिंदे, दिनेश कदम, शिवदास भोसले, अमोल जाधव, प्रमोद कांबळे, अमोल गणेशवाडे, विनायक कदम, शिवाजी कोळी उपस्थित होते.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे यांना पर्यावरण प्रेमींनी हा वृक्ष संवर्धन करण्यासाठी आवाहन केले होते, त्याला सकारात्मक प्रतिसाद देत, जिल्हा परिषद प्रशासन या वटवृक्षाच्या फांद्या जिल्ह्यातील ७०० गावात लावणार आणि जपणार आहे. या निमित्ताने या ऐतिहासिक वटवृक्षाचे जनुकीय जपणूक होणार आहे. मंगळवारी जिल्हा परिषद प्रशासनाकडून ग्रामपंचायत उपमुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत शिंदे, गट विकास अधिकारी अविनाश पाटील, ग्रामसेवक विनायक मोरे यांनी यलम्मा मंदिर परिसरात वटवृक्ष येथे भेट दिली यावेळी भोसे सरपंच पर्शवनाथ चौगुले, विकास चौगुले तसेच वन विभागाचे सह्यायक वन संरक्षक अजित साजने यांच्या सूचनेनुसार वन विभाग यांच्याककडून वनपाल तुषार भोरे उपस्थित होते.

सयाजी शिंदेंनी घेतली माहिती

महामार्गाच्या कामातून हा वटवृक्ष वाचविण्याच्या चळवळीत अभिनेते सयाजी शिंदे यांनीही सहभाग नोंदविला होता. वटवृक्ष कोसळल्यानंतरही त्यांनी याबाबत निसर्गप्रेमींकडून माहिती घेतली. धोकादायक पाऊल उचलण्याऐवजी त्याच झाडांच्या मुळांचा वापर करुन अन्यत्र वृक्षलागवड करावी, अशी सूचना त्यांनी केली.

# चार चाकीचा भीषण अपघात

## दोघे जागीच ठार, दोघे जखमी

**अकलूज :** अतिशय वेगाने महर्षि चौकाकडुन जयसिंह चौकाकडे निघालेल्या चार चाकी वाहनावरील नियंत्रण सुटून झालेल्या अपघातात दोन युवक जागीच ठार तर दोघेजण जखमी झाल्याची घटना अकलूज येथे घडली आहे.

याबाबत अकलूज पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की, शुभम बाळू चव्हाण (वय २३), यश नवनाथ शिंदे (वय २०) दोघे रा. वेळापूर, राहुल बापूसाहेब कोळेकर (वय २४) रा. उघडेवाडी व समाधान बुवा सरतापे (वय २३) रा. खुडुस ता. माळशिरस हे चौघे मित्र रात्री साडे अकराच्या सुमारास महर्षि चौकातून जयसिंह चौकाकडे निघाले होते. त्यावेळी त्यांची गाडी प्रचंड वेगात होती. वेगावर नियंत्रण न ठेवता आल्याने अनियंत्रीत झालेली गाडी (क्र. एमएच ४५ एन ०००८ निसान टेरेनो) रस्त्यालगत असणाऱ्या दोन झाडांना धडकली. रस्त्या कडेला लावण्यात आलेल्या मैलाच्या दगडाला धडकून गाडी उलट्या दिशेला फिरली.

ही धडक येवढी जबरदस्त होती की, मधल्या सिटवर बसलेल्या राहुल कोळेकर याच्या डोक्याचा अर्धा भाग तुटुन रस्त्यावर पडला होता. तर समाधानच्याही डोक्याला मार लागल्याने त्यांचा जागेवरच मृत्यू झाला. शुभम चव्हाण व यश शिंदे हे किरकोळ जखमी झाल्याने त्यांना खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

जखमी व्यक्ती उपचारासाठी दवाखान्यात असल्याने गाडी नक्की कोण चालवत होते हे अद्याप समजु शकले नाही. ही तरूण मुले दारूच्या नशेत गाडी चालवत होती की नशा न करता गाडी वेगात चालवल्याने हा अपघात झाला हे तपासात लवकरच समजुन येईल.

# बारामतीसह दौंड, इंदापूर आणि पुरंदरच्या औद्योगिक विकासासाठी माझा प्लॅन तयार

## पंतप्रधान मोदींची देखील मदत घेणार: शरद पवार

**बारामती :** बारामती, इंदापूर, दौंड आणि पुरंदर तालुक्याच्या औद्योगिक विकासासाठी साठी माझा प्लॅन तयार असून या भागात मोठ्या प्रमाणात उद्योग आणणार असून त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींची देखील मदत घेणार असल्याचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी शरद पवार यांनी बोलताना सांगितले.

**मोदींना जमिनीवर आणले**

**नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये १० वर्षे सत्तेत राहिलेल्यांना जनतेने जमिनीवर आणले असल्याची टीका करत शरद पवार म्हणाले, निवडणुका येतात जातात, देशाला स्थिरतेची आवश्यकता आहे. मजबूत अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने ठोस पावले उचलणे गरजेचे आहे.**

लोकसभा निवडणुक निकालानंतर बारामती शहरातील महावीर भवन याठिकाणी आयोजित व्यापारी मेळाव्यात पवार पवार बोलत होते. यावेळी विठ्ठलशेठ मणियार, मदन बाफना, सदाशिव सातव, जवाहर वाघोलीकर, युवा नेते युगेंद्र पवार ,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष संदिप गुजर, तालुकाध्यक्ष ड. एस .एन. जगताप, पौर्णिमा तावरे, सुशीलकुमार सोमानी, सुधीर पाटसकर, सुनील सस्ते, शहर युवकअध्यक्ष सत्यव्रत काळे, नरेंद्र गुजराती, संभाजी किरवे, निलेश भिंगे, महावीर शहा, जगदीश पंजाबी, वनिता बनकर तसेच बारामती शहरातील व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पवार म्हणाले, यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असताना पुण्यामध्ये एमआयडीसी आली. त्यानंतर मी जेजुरी, बारामतीसह इंदापूर, भिगवण, चाकण, शिरवळ येथे एमआयडीसीचे जाळे पसरले. त्यानंतर हे तालुके व्यापाराचे केंद्र बनले. कारखानदारीमुळे व्यापार व्यवसाय वाढला. औद्योगिकीकरणामुळे या भागातील संपूर्ण चित्र बदलून अनेकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळाला.


याठिकाणी व्यवसायाची नवीन केंद्र उभा राहिली आहेत. येणाऱ्या काळात देखील उद्योग उभारणी होणार आहे. नरेंद्र मोदी यांनी माझ्यावर वैयक्तिक टीका केली; मात्र ते मी विचारात घेत नाही. बारामती परिसराची औद्योगिक स्थिती सुधारण्यासाठी केंद्र व राज्य सरकारची मदत घ्यावी लागेल त्यामुळे बारामतीकरांची संपत्तीक स्थिती सुधारण्यास मदत होणार आहे. त्यासाठी एका विचाराने राहून अर्थकरण कसे मजबूत होईल याकडे सर्वांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

हिंजवडी या ठिकाणी आयटी पार्क उभा केल्याने अकरा हजार कोटींच्या त्या प्रकल्पातून तीन लाख लोकांना त्या ठिकाणी रोजगार मिळाला आहे. आपल्या भागाचा आणखी कायापालट करण्यासाठी बारामतीकरांनी सहकार्य करण्याची आवश्यकता असल्याचे पवार यांनी यावेळी सांगितले. आभार निलेश निंबळककर यांनी मानले.

# देहूनगर पंचायतीचे नगरसेवक प्रवीण काळोखे यांच्यावर शूभेच्छाचा वर्षाव

**पुणे :** श्रीक्षेत्र देहू येथील देहू नगरपंचायतचे दमदार नेतृत्व आणि कर्तव्यदक्ष, तरुणांचे आशास्थान असलेले देहूनगर पंचायतीचे लोकप्रिय नगरसेवक प्रवीण काळोखे यांचा वाढदिवस ,गुरुवारी विविध सामाजिक उपक्रम राबवून उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला.

या वाढदिवसानिमित्त अंध अपंग व्यक्तींना कपडे मिठाईचे वाटप तसेच भरती असलेले



हॉस्पिटलमधील पेशंटला नारळ पाणी सफरचंद वाटप करण्यात आले त्याबरोबरच अनाथ विद्यार्थीना वही पुस्तक पेन देण्यात आले यावेळी

देहूनगर पंचायतीच्या वतीने देहूच्या नगराध्यक्षा पूजा दिवटे, नगरसेवक योगेश काळोखे ,योगेश परंडवाल, पूजा काळोखे , मयूर शिवशरण, राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष विवेक काळोखे, स्वप्नील हगवणे, अमोल दिवटे, सुमित काळोखे, सुमित काळोखे, श्रीराम मोरे, किशोर कदम, प्रशांत काळोखे, श्रावण हगवणे, दीपक काळोखे, अक्षय धुमाळ, सचिन हगवणे आदींनी केक कापून प्रवीण काळोखे यांचा वाढ दिवस साजरा केला. तर प्रवीण काळोखे यांच्या चाहत्यांनी दिवसभर शुभेच्छाचां वर्षाव केला.प्रवीण काळोखे यांनी देखील सर्वांना धन्यवाद दिले.

## पश्चिम रेल्वेच्या लोकलला डिजिटल डिस्प्ले

**मुंबई :** रेल्वे स्थानकांच्या फलाटांवर आलेली लोकल नेमकी कोणती आहे ? हे पाहण्यासाठी प्रवाशांना एक तर इंडीकेटर बघावे लागते किंवा लोकलच्या दर्शनी भागावर नजर ठेवावी लागते. मात्र हे पाहण्यात गोंधळ झाला तर लोकल कोणती आहे ? हे सहप्रवाशांना विचारावे लागते. यावर दिलासा म्हणून पश्चिम रेल्वे नवीन युक्ती शोधून काढली असून, पश्चिम रेल्वेच्या लोकलवर डिजिटल डिस्प्ले लावण्यात येत आहेत. याद्वारे फलाटावर दाखल झालेली लोकल कोणती आहे ? हे प्रवाशांना समजण्यास आणखी मदत होणार आहे.

मुंबई सेंट्रल येथे असलेल्या पश्चिम रेल्वेच्या ईएमयू कारशेडने नवीन हेड कोड डिस्प्ले सादर केला आहे. हे वैशिष्ट्य प्रवाशांना लोकल ट्रेनच्या गंतव्यस्थानाची स्पष्ट आणि त्वरित माहिती करून देईल. डिस्प्लेचे वैशिष्ट्य म्हणजे जेव्हा गार्ड मूळ स्थानकावर त्याच्या कॅबमध्ये बसतो आणि ट्रेनचा क्रमांक फीड करतो तेव्हा प्रवासाचे सर्व तपशील बाजूला बसवलेल्या डिजिटल डिस्प्लेवर अचूकपणे दिसतात. डिजिटल डिस्प्ले ३ सेकंदांच्या अंतराने भाषा बदलून इंग्रजी, हिंदी आणि मराठी भाषांमध्ये ट्रेनचे गंतव्यस्थान दर्शवेल. याशिवाय लोकल जलद किंवा धीमी आणि बारा डबे कि पंधरा डबे अशी माहिती मिळणार आहे.

# नेत्रा पवार यांचा राज्यसभेवरील बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा

## बारामतीत राष्ट्रवादीकडून जल्लोष

**बारामती :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी मुंबईतील विधानभवनात राज्यसभा सदस्य पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर त्यांच्या विरोधात एकही उमेदवारी अर्ज दाखल न झाल्याने त्यांचा राज्यसभा सदस्य पदी बिनविरोध चा मार्ग मोकळा झाल्याने बारामती शहरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने फटाक्यांची आतषबाजी व गुलालाची उधळण करत जल्लोष करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांना पेढे भरून जल्लोष केला.

बारामती लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीमध्ये सुनेत्रा पवार यांचा पराभव विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांनी केल्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे. मात्र या पराभवानंतर राज्यसभा सदस्यत्व पदासाठी सुनेत्रा पवार यांचा उमेदवारी अर्ज आज दाखल करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस साठी ही दिलासादायक बाब असल्याने राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला. सुनेत्रा पवार यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर, त्यांचा बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे. औपचारिक घोषणा बाकी आहे. लोकसभेच्या निवडणूक निकालानंतर निराश असलेल्या बारामतीतील राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा उत्साह मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. बारामती शहरातील भिगवण चौक या ठिकाणी फटाक्यांची आतषबाजी करत गुलालाची उधळण करण्यात आली. यावेळी पेढे वाटण्यात आले. यावेळी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष जय पाटील, माजी नगराध्यक्ष सुभाष सोमानी, युवकचे अध्यक्ष अविनाश बांदल, माजी उपनगराध्यक्ष नवनाथ बल्लाळ, अभिजीत जाधव, महिला राष्ट्रवादीच्या शहराध्यक्ष अनिता गायकवाड, प्रताप पागळे, अभिजीत काळे, श्रीकांत जाधव, ड धीरज लालबिगे आदींसह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान बारामती शहरातील इतर ठिकाणीही फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.

# रिल्समधील खुन्नस जीवावर बेतली; दिवसाढवळ्या तरुणाचा धारदार शस्त्राने खून

**कोल्हापूर :** टोळी युध्दातून गुरुवारी दुपारी संभाजीनगर पेट्रोल पंपामागे रस्त्यावर खूनाची घटना घडली. मित्रांसोबत या परिसरात गप्पा मारत बसलेल्या सुजल कांबळेवर दुचाकीवरून आलेल्या ६ ते ७ जणांनी तलवारी आणि एडक्यानं जबरदस्त हल्ला करून, त्याचा निर्घुण खून केला. या घटनेनंतर हल्लेखोर पसार झाले. त्यांचा पोलिसांकडून शोध सुरू आहे.

कोल्हापुरातील वारे वसाहत परिसरात सुजल कांबळे, आई, वडिल आणि भावासह राहतो. सध्या त्याचा भाऊ पुण्यात नोकरी करतो. सुजल या परिसरातील तरूणांच्यात ग्रुपमध्ये असायचा. त्याच्या ग्रुपमधील तरूण सोशल मीडियावर ॲक्टिव आहेत. तसंच ते राजेंद्रनगरातील स्वर्गीय कुमार गायकवाड याचे समर्थक असल्यानं तिथल्या स्थानिक गटाचा सुजल कांबळे आणि त्याच्या गटातील तरूणांना विरोध आहे. त्यातूनच त्यांच्या वाद आहे. तसंच सोशल मीडियावर देखील ते एकमेकांना आव्हान देतात. त्यातून या दोन टोळयात धुसमूस वाढली होती.

आज दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास सुजल कांबळे हा रोहीत जाधव, राज खेडकर, संतोष कुदळे या तरूणांसोबत संभाजीनगर पेट्रोल पंपामागील शहाजी वसाहत परिसरातील रस्त्यावर गप्पा मारत बसले होते. दरम्यान दोन ते तीन दुचाकीवरून हातात शस्त्र घेवून ६ ते ७ तरूण टिंबर मार्केट ते सुधाकर जोशी नगर रस्त्यावर आले. त्यांनी थेट सुजल कांबळेवर हल्ला केला.

अचानक झालेल्या हल्ल्यानं त्याच्यासोबत असलेले तरूण घाबरुन पळाले. हल्लेखोरांनी तलवार आणि एडक्यानं सुजल कांबळेवर हल्ला केला. हातावर, पोटावर, पाठीवर आणि मानेवर वार झाल्यानं, सुजल रस्त्यावर कोसळला. दरम्यान त्यानं फोन करून मित्रांना बोलवलं. अभिषेक जाधव आणि संतोष कुदळे यांनी घटनास्थळी येवून दुचाकीवर बसून, सुजलला तातडीनं सीपीआरमध्ये दाखल केलं. पण उपचारापूर्वी त्याचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच सुजलचे कुटुंबीय, नातेवाईक आणि वारेवसाहतीतील नागरिकांनी सीपीआरमध्ये गर्दी केली. प्राथमिक चौकशीत सोहेल शेख, आकाश गस्ते, सादीक पिटर, आदर्श शेडेकर, यश पोतदार, सुमित कांबळे यांनी खूनी हल्ला केल्याची माहिती पोलिसांना मिळाली असून, जुना राजवाडा तसंच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलिस संशयितांचा शोध घेत आहेत.


# चार दिवसात तब्बल आठ पोती चपला कचराकुंडीत

**कोल्हापूर :** श्री अंबाबाई देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना देवस्थान समितीच्या नियोजन शून्य कारभारामुळे आणि स्वतः भाविकांच्या हलगर्जीपणामुळे भुर्दंड सहन करावा लागत आहे. योग्य ठिकाणी चप्पल स्टॅन्डचे नियोजन नाही यामुळे भाविक दिसेल त्या ठिकाणी चप्पल काढत आहेत. दरम्यान भाविकांना शिस्त लागावी यासाठी देवस्थान समितीचे कर्मचारी भाविकांच्या चप्पला एकत्र करून रिकाम्या केबिन मध्ये टाकत आहेत यामुळे अनेक भाविकांना चपला मिळत नसल्याने अनवाणी जावं लागत आहे. गेल्या चार दिवसात तब्बल आठ पोती चपलांना कचराकुंडी दाखवण्यात आली आहे.

करवीर निवासिनी श्री अंबाबाई देवीच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविक येत असतात मात्र येणाऱ्या भाविकांना सेवा सुविधा देण्यामध्ये देवस्थान समिती नेहमी कमी पडताना दिसत आहे. यामध्ये चप्पल स्टॅन्ड चा मुद्दा हा कळीचा मुद्दा बनला आहे. मंदिराच्या भिंतीला लागून असणारी चप्पल स्टॅन्ड महापालिकेच्या वतीने हटवण्यात आली, त्यानंतर दक्षिण दरवाजा परिसरात चप्पल स्टॅन्ड ची उभारणी करण्यात आली.

मात्र भवानी मंडप परिसरातून येणारे भाविक मंदिर परिसरात कुठेही चपला काढून देवीच्या दर्शनासाठी जात आहेत. यामुळे देवस्थान समितीचे कर्मचारी भाविकांनी काढलेल्या चप्पला चप्पल स्टॅन्ड परिसरातील रिकाम्या केबिनमध्य आणून टाकत आहेत भाविकांनी काढलेल्या चपला गोळा करण्यासाठी देवस्थान समितीच्या वतीने कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवाय चप्पला स्टॅन्डला काढा अशा सूचना देखील दिल्या जातात, मात्र अनेक भाविक याकडे दुर्लक्ष करून मिळेल त्या जागी चपला काढत आहेत. दरम्यान काढलेल्या चपला न मिळाल्यामुळे अनेक भाविकांना अनवाणी पायी परतावं लागत असून देवस्थान समितीच्या ढिसाळ कारभारामुळे आणि भाविकांच्या हलगर्जीपणामुळे स्वतः भाविकांना भुर्दंड सहन करावा लागत आहे. यामुळे गेल्या चार दिवसात तब्बल आठ पोती चपलांना कचराकुंडी दाखवण्याची वेळ आली आहे. श्री अंबाबाई मंदिरास चार दरवाजे आहेत या चारही दरवाजांमधून भाविकांचे येणे जाणे सुरू असते यामुळे या मंदिर परिसरात योग्य ठिकाणी चप्पल स्टॅन्ड चे उभारणी करणे अत्यंत गरजेचे आहे.

# तासगावात बिबट्याचा व्हिडिओ व्हायरल : नागरिकांत घबराट



**तासगाव :** राज्यमार्ग ओलांडत असलेल्या बिबट्याचा व्हिडिओ तासगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. हा व्हिडिओ तासगाव पासून आठ ते दहा कि.मी. अंतरावर असलेल्या शिरगांव (वि) या गावा नजीकचा असल्याचे बोलले जात आहे. या अनुषंगाने, नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहनही शिरगांव (वि) ग्रामपंचायतने केले आहे. याची माहिती मिळाल्यानंतर वनविभागाने याठिकाणी भेट दिली.

सदरचा व्हिडिओ हा बुधवार (दि.१२) रात्री उशिराचा असल्याचीही चर्चा सुरु आहे. हा व्हिडिओ गुरुवारी सकाळी शिरगांव येथील काहींनी पाहिल्यानंतर ग्रामपंचायत वतीने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यानंतर वनविभागास माहिती मिळताच या ठिकाणी भेट देवून बिबट्या असल्याची खात्री करण्यासाठी आवश्यक ती मोहीम सुरु केली आहे.

राज्यमार्ग ओलांडत असलेल्या बिबट्याचा व्हिडिओ तालुक्यात मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्याने शिरगांवसह संपूर्ण तासगाव तालुक्यात व परिसरातील नागरिकांत घबराट निर्माण झाली आहे. या परिसरात एकट्याने बाहेर पडू नये. रात्रीच्या वेळेस बरोबर टॉर्च बाळगावा. आवश्यक ती सतर्कता बाळगावी असे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे.

# रामदास आठवले मंत्री झाल्याने सावळजमध्ये आनंदोत्सव

## कार्यकर्त्यांकडून फटाक्यांची आतिषबाजी ; अनेक विकास कामांना गती मिळणार

**तासगांव :** तासगाव तालुक्यातील सावळज येथे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी तिसऱ्यांदा मंत्री म्हणून शपथ घेतल्या नंतर सावळज येथे फटाक्याची आतिषबाजी व लाडू वाटप करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले आनंदोत्सव साजरा करण्यात आला. एनडीए आघाडीत रामदास आठवले यांना लोकसभा निवडणुकीसाठी एकही जागा मिळाली नव्हती परंतु त्यांनी प्रामाणिक पणे एनडीए ची भूमिका लोकांपर्यंत पोहचून एनडीए आघाडीच्या विजयात मोलाचा वाटा उचलला आहे. सावळज गावाशी रामदास आठवले यांचा कायम स्नेह राहिला असुन त्यांचे बालपण याच गावात गेले आहे. त्यांच्या आईंनी त्यांना अतिशय कष्टाने त्यांना मोठे



केल्याची भावना अनेक ग्रामस्थ आजही व्यक्त करतात.

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या माध्यमातून तासगाव तालुक्यातील सामान्य घटकांना केंद्रबिंदू मानून अनेक विकास कामे येणाऱ्या काळात पूर्ण केली जातील. अशी माहिती आरपीआयचे तासगांव तालुकाध्यक्ष प्रवीण धेंडे यांनी यावेळी दिली.

यावेळी, सतिश धेंडे, पांडुरंग भिसे, महावीर धेंडे, मनिष धेंडे, अमित रणखांबे, बाळू धेंडे, सागर शिंदे, पवन भिसे, अनिकेत पवार, राज भिसे, शाहरुख कांबळे, बबलू धेंडे, मनोहर धेंडे, प्रणील भिसे, अक्षय कांबळे , हर्ष धेंडे, संपत भिसे, सुभाष काटे, योगेश काटे, तुषार कांबळे यासह अनेक कार्यकर्ते ग्रामस्थ उपस्थित होते.